महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर अंतर्गत अहमदनगर जिल्ह्यात नवीन पदवी पशुवैद्यकीय महाविद्यालय स्थापन करण्याबाबत..

# महाराष्ट्र शासन

**कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,**

**शासन निर्णय क्रमांक : मपवि २०२३/प्र.क्र. ७३ /पदु २**

मंत्रालय विस्तार, मुंबई-४०००३२

दिनांक :- ०१ डिसेंबर, २०२३

**संदर्भ** :- १) कुलसचिव, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर यांचे क्र. MAFSU/Reg/१२५/२०२३, दिनांक २८ एप्रिल, २०२३ चे पत्र

२) महसूल व वन विभाग शासन ज्ञापन क्र : जमीन-३३२३/प्र.क्र.२३७/ज-६, दिनांक १२ सप्टेंबर, २०२३

**प्रस्तावना :-**

सन २०१५ मध्ये राष्ट्रीय पशु विज्ञान अकादमी, नवी दिल्ली या संस्थेने Human Resource Needs in Veterinary and Animal Science या विषयावर भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली यांना सादर केलेल्या अहवालानुसार सद्य:स्थितीत देशात ५० टक्के पशुवैद्यकांची कमतरता असून सन २०३५ पर्यंत सदर १,२५,००० एवढया पशुवैद्यकांची आवश्यकता असेल, असे नमूद केले आहे. तसेच देशात शासकीय /खाजगी नवीन पशुवैद्यक महाविद्यालय स्थापन करण्याबाबत शिफारस केली आहे.

२. महाराष्ट्र राज्यात पशुवैद्यक विद्याशाखेचा मोठ्या प्रमाणात विस्तार करणे गरजेचे असून पशुवैद्यक विद्याशाखेतील सध्याची विद्यार्थ्यांची संख्या दुप्पट करणे आवश्यक आहे. सद्य:स्थितीत कार्यरत असलेल्या पशुवैद्यक महाविद्यालयामधून निर्माण होणारे पशुवैद्यक मनुष्यबळ, तसेच राज्यातील पशुधनाची संख्या विचारात घेता, राज्यामध्ये पशुसंवर्धन विषयक सेवा देण्याकरिता आवश्यक व्यावसायिक सेवा देणारे मनुष्यबळ अपुरे ठरत आहे. त्यामुळे भारतीय पशुवैद्यक परिषदेच्या मानकानुसार पशुवैद्यक महाविद्यालयाच्या विस्ताराकरिता योग्य निर्धारण व साधन सामुग्रीवर गुंतवणूक करणे गरजेचे आहे. या सर्व बाबी विचारात घेता, अहमदनगर जिल्ह्यात नवीन पदवी पशुवैद्यक महाविद्यालय स्थापन करण्यास दिनांक १९/१०/२०२३ रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मंत्रिमंडळाने मान्यता दिलेली आहे. त्यानुसार अहमदनगर जिल्ह्यात नवीन पदवी पशुवैद्यकीय महाविद्यालय स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

उक्त वस्तुस्थिती विचारात घेता, अहमदनगर जिल्हयात **मौजे. सावळी विहीर खुर्द, शिर्डी, ता. राहाता, जि. अहमदनगर** येथे (गट क्र. ७२/१, गट क्र. ८८, गट क्र ८९, गट क्र. ९० व गट क्र. ९२ येथील एकूण क्षेत्र ४९.७० हे.आर पैकी ३० हे. ०३.५० आर (सुमारे ७५ एकर)) सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षापासून महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर अंतर्गत नवीन पदवी पशुवैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

३. सदर पदवी पशुवैद्यकीय महाविद्यालयासाठी नियमीत स्वरुपातील शिक्षक संवर्गातील ९६ आणि शिक्षकेत्तर संवर्गातील १३८ पदे तसेच बाह्यस्त्रोताव्दारे शिक्षकेत्तर संवर्गातील भरावयाची ४२ पदे, अशा एकूण २७६ पदांस उच्चाधिकार समितीच्या मान्यतेच्या अधीन राहून मंजूरी देण्यात येत आहे.

४. सदर पदवी पशुवैद्यकीय महाविद्यालयासाठी पुढील ५ वर्षासाठी मनुष्यबळासाठी रु.९७४८.९३ लक्ष आणि कार्यालयीन खर्चासाठी रु. ९७१.०० लक्ष अशा एकूण रु १०७१९.९३ लक्ष एवढया आवर्ती खर्चास परिच्छेद क्र. ५ मधील तक्त्यातील अ.क्र. १ व २ मध्ये दर्शविल्याप्रमाणे मान्यता देण्यात येत आहे.

५. तसेच सोबत जोडलेल्या **परिशिष्ट "अ"** मध्ये दर्शविल्याप्रमाणे बांधकामाकरीता खर्च रु. ३४६१३.०० लक्ष, उपकरणे खरेदीसाठी रु. ३८५०.०० लक्ष आणि वाहन खरेदीसाठी रु. ७६.०० लक्ष एवढया अनावर्ती खर्चास खालील तक्त्यातील अ.क्र. ३ ते ५ मध्ये दर्शविल्या प्रमाणे टप्प्या टप्प्याने खर्च करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

(रु लाखात)

| अ.क्र | तपशील | प्रथम वर्ष | व्दितीय वर्ष | तृतीय वर्ष | चतुर्थ वर्ष | पाचवे वर्ष | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मनुष्यबळ | ७१४.७८ | ११८०.३६ | २०८६.३० | २७८२.७९ | २९८४.७० | **९७४८.९३** |
| २ | कार्यालयीन खर्च | ७२.०० | १२०.०० | २०९.०० | २८०.०० | २९०.०० | **९७१.००** |
| ३ | बांधकाम | १३८३०.०० | १०७८३.०० | १००००.०० | ०० | ०० | **३४६१३.००** |
| ४ | उपकरणे | ४५०.०० | ५५०.०० | २०००.०० | ८५०.०० | ० | **३८५०.००** |
| ५ | वाहने | ३१.०० | २५.०० | २०.०० | ० | ० | **७६.००** |
| | **एकूण** | **१५०९७.७८** | **१२६५८.३६** | **१४३१५.३०** | **३९१२.७९** | **३२७४.७०** | **४९२५८.९३** |

६. सदर महाविद्यालयासाठी पुढील ५ वर्षाच्या कालावधीत अतिरिक्त नियतव्यय व त्यानुसार विहित मार्गाने तरतूद उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

७. सदर महाविद्यालयातील शिक्षक/शिक्षकेत्तर संवर्गातील अधिकारी/कर्मचारी यांच्या वेतनपोटी व कार्यालयीन खर्चासाठीचा अनिवार्य खर्च "मागणी क्रमांक डी - ४, २४०३ पशुसंवर्धन, १०९ विस्तार व प्रशिक्षण (००)(०९) महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठाची स्थापना (२४०३ २१४३) अनिवार्य, ३६- सहायक अनुदाने (वेतन व भत्ते) व ३१-सहायक अनुदाने (वेतनेत्तर)" या लेखाशिर्षाखाली मंजूर करण्यात आलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

८. तसेच बांधकाम, उपकरणे व इतर अनुषंगीक बाबींच्या खरेदीसाठीचा खर्च कार्यक्रम खर्च "मागणी क्रमांक डी -४, (२४०३) पशुसंवर्धन, १०९ विस्तार व प्रशिक्षण, (००) (१९) महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठाची स्थापना, (२४०३ २०९२) कार्यक्रम, ३१-सहायक अनुदान (वेतनेत्तर)" या लेखाशिर्षाखाली मंजूर करण्यात आलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा. सदर बाबीसाठी अतिरिक्त नियतव्यय प्राप्त करुन, अर्थसंकल्पीत करुन त्या निधीमधून सदर खर्च भागविण्यात यावा.

९.    सदर शासन निर्णय नियोजन विभागाच्या अनौ.सं.क्र. २६७/का १४३१, दि. ०९/०६/२०२३ आणि वित्त विभागाच्या अनौ.सं.क्र. ६८४/२०२३/व्यय२, दि. २९/११/२०२३, अन्वये प्राप्त झालेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

१०.   सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०२३१२०११५२३४७१४०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने स्वाक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने.

NIWRUTTI BHAGUJI MARALE

Digitally signed by NIWRUTTI BHAGUJI MARALE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=AGRICULTURE AND ADF DEPARTMENT, 2.5.4.20=8a75c414ff50ce35220c63cd53d2eb1a99a474c02300beea74bb051c4c3c90a9, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=5C891DA87D2A4842558454524CC114BA5B2F67A2A80796592830D345500F15CC, cn=NIWRUTTI BHAGUJI MARALE
Date: 2023.12.01 15:24:49 +05'30'

**( नि.भा. मराळे )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा. विरोधी पक्ष नेता, विधान सभा/ विधान परिषद, विधान भवन, मुंबई
२. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
३. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई -३२
४. मा. उप मुख्यमंत्री, यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई -३२
५. मा. मंत्री (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय), यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई -३२
६. कुलगुरु, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, फुटाळा तलाव रोड, नागपूर
७. आयुक्त, पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे.
८. महालेखापाल महाराष्ट्र १/२ (लेखा परिक्षा) /(लेखा अनुज्ञेयता), मुंबई/ नागपूर.
९. कुलसचिव/नियंत्रक (वित्त व लेखा), महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर.
१०. जिल्हा कोषागार अधिकारी, नागपूर.
११. वरिष्ठ प्रशासन अधिकारी(गट-अ) प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त नागपूर विभाग, नागपूर.
१२. वित्त विभाग (व्यय-२)/नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई -३२
१३. निवडनस्ती (पदु २)

## परिशिष्ट “अ”
## बांधकामासाठी लागणाऱ्या खर्चाचा तपशील

| अ.क्रं. | तपशिल | क्षेत्रफळ (स्के.फुट) | क्षेत्रफळ (स्के.मीटर) | रूपये लाखात |
|---|---|---|---|---|
| १. | सामायिक इमारती | ३८१५०० | ३५४४३ | १०६३२.९० |
| २. | निवासी इमारती (विभाग निहाय) | ९८३०० | ९१३२ | २७३९.६० |
| ३. | वसतिगृह | ९२५०० | ८५९४ | २५८६.७९ |
| ४. | प्रेक्षागृह | २०००० | १८५८ | ५५९.२६ |
| ५. | मैदाने (आंतर व बाह्य क्रीडांगणे) | ३३७१८० | ३१३२५ | २४१५.०० |
| | **एकूण** | **९२९४८०** | **८६३५२** | **१८९३४.००** |
| ६. | अधिक विद्युतीकरण, किटक प्रतीबंधक, बाह्य पाणी पुरवठा, बाह्य विद्युतीकरण, फर्निचर, अग्निरोधक साहित्य, मैदानगार, बगीचे, सौर उर्जा सयंत्र, अंतर्गत रस्ते, आवार भिंत, विहीर, विंधन विहीर, इत्यादी | -- | -- | १४४५७.०० |
| ७. | अधिक वास्तु रचनाकार खर्च, किरकोळ खर्च इत्यादी | -- | -- | १२२२.०० |
| | **एकूण** | | | **३४६१३.००** |